प्रकरण दुसरे

# संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे

# संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा

| | | |
|---|---|---|
| २.० | प्रस्तावना | ३५ |
| २.१ | पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा | ३५ |
| २.२ | संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा | ४९ |
| २.३ | प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण | ५१ |

## प्रकरण दुसरे

# संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा

### २.० प्रस्तावना

मागील प्रकरणात समस्येच्या संदर्भातील काही संकल्पना, तसेच मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन, नेतृत्व, शाळांचे संघटनात्मक वातावरण, समस्या विधान, समस्या स्पष्टीकरण, समस्या संशोधनाचे महत्त्व, समस्येची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची गृहितके, उद्दिष्टे आदी बाबींचा अंतर्भाव केलेला आहे.

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन समस्येच्या संदर्भात पूर्वी कोणत्या स्वरूपाचे संशोधन कार्य झालेले आहे, याचा आढावा घेतलेला आहे. यामुळे संशोधन समस्येची व्याप्ती निश्चित करणे, संशोधनाची उद्दिष्टे ठरविणे, न्यादर्श ठरविणे, संशोधनाची साधने निश्चित करणे, कार्यपद्धती ठरविणे या बाबी सुलभ झाल्या. संशोधन संबंधित साहित्याचा आढावा म्हणजे प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित जे ज्ञान उपलब्ध आहे, त्याचा अभ्यास होय. एखाद्या समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी आढावा हा संशोधन प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे.

संशोधक आपल्या समस्येच्या अनुषंगाने जी पूर्वी संशोधने झालेली आहेत, त्यांचा मागोवा घेतला, तर याच प्रकारची परंतु भिन्नता असलेली संशोधने अभ्यासली आहेत, ती खालीलप्रमाणे-

### २.१ पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा

**Karmgaogi R. P.**

An Investigation into the porblem of Education Administration in madhya Pradesh from 1947 with reference to secondary Education. (Ph.D. Edu. - Rsu - 1974)

**उद्दिष्टे**

१) शैक्षणिक प्रशासनामध्ये प्रामुख्याने अंतर्गत सेवा, पगार, प्रशासकीय मदत, शैक्षणिक विभागाचा आकार, कार्यभार, नेमणूक, पदोन्नती, बदली आणि शिक्षकाचे प्रशिक्षण इ. समस्यांचा अभ्यास करणे.

२) शालेय संघटना, बेशिस्त, परीक्षा, मूल्यमापन, घर व शाळा, समाज यांमधील परस्पर संबंध यांसारख्या शालेय व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

**नमुना निवड**

शिक्षण संचालनालयातील अधिकारी, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, शिक्षण संचालक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकाची निवड केली. प्रश्नावली ३२५० जणांना पाठवून मुलाखती घेतल्या. विधानसभेचे प्रोसिडिंग व शिक्षणाधिकारी कार्यालयातील नोंदीचा संदर्भ घेण्यात आलेला आहे.

**प्रमुख निष्कर्ष**

१. शैक्षणिक पात्रता, देय पगार आणि कामाची स्थिती समाधानकारक नव्हती.

२. शैक्षणिक व्यवस्थापकासाठी खास प्रकारचे प्रशिक्षण नव्हते.

३. ६० टक्के शाळांमध्ये अत्यावश्यक सोयी-सुविधा याचा अभाव होता.

४. शाळा आणि समाज यात परस्पर सहकार्य नव्हते.

५. शाळेमध्ये कसल्याही प्रकारची संघटना निर्माण झाली नव्हती.

**Verma J. P.**

"A comparative study of Administrative probelms of single and double shift secondary schools in Rajesthan.

(Ph.D. Edu. Valai. V. 1974)

**उद्दिष्टे-**

१. दुबार पद्धतीच्या माध्यमिक शाळांच्या समस्यांची ओळख करून घेणे. यामध्ये प्रामुख्याने संघटना, परस्पर सहकार्य संवाद, निर्णय घेणे, देखरेख, शारीरिक आणि मानवी गोष्टींची उपयुक्तता आदी समस्यांचा अभ्यास करणे.

२. एक वेळ भरणाऱ्या शाळेशी वरील समस्यांची तुलना करणे.

३. दोन्ही प्रकारच्या शाळेमध्ये येणाऱ्या समस्यांच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

४. या व्यवस्थापकीय समस्या सोडविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी नवीन मार्गाचा शोध घेणे.

संशोधकाने तीन टप्प्यांमध्ये अभ्यास केला. विविध प्रकारचे नमुने घेण्यात आले. त्यामध्ये फक्त माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचाच समावेश केला. मात्र यातून Public Missionary School आणि इतर प्रकारच्या शाळांचा समावेश नव्हता. अगदी पहिल्या टप्प्यामध्ये

८ मुख्याध्यापक आणि ३२ शिक्षक वेगवेगळ्या प्रकारच्या शाळांतून निवडण्यात आले. उदा. सकाळी भरणाऱ्या आणि दुपारी भरणाऱ्या शाळेतून दुसऱ्या टप्प्यात प्रत्येकी १३० मुख्याध्यापक आणि ५२० शिक्षक दोन्ही प्रकारच्या शाळेतून निवडण्यात आले. यामध्ये मात्र विविध प्रकारच्या शाळेचे प्रतिनिधी होते. उदा. खासगी, सरकारी ग्रामीण, शहरी, मुलींची, मुलांची आणि अभ्यासकुमारी संबंधित

तिसऱ्या विस्तारित टप्प्यामध्ये दुसऱ्या टप्प्यात निवडलेल्या २६० संस्थांपैकी २० संस्थांची निवड करण्यात आली. या तिन्ही टप्प्यात वापरलेल्या गोष्टी म्हणजे-

१. मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठीच्या ४ प्रश्नावल्या.

२. प्रशासन आणि विद्यार्थी यांच्या मुलाखतीच्या दोन साचा नमुना.

३. माहितीपत्रक

४. समाजहित

५. शिक्षकांची एक निरीक्षण यादी आणि

६. शालेय नोंदी आणि शालेय वेळापत्रक

**प्रमुख निष्कर्ष**

१. कार्यक्रम आयोजकाच्या मते दोन शिफ्टपेक्षा एका शिफ्टमध्ये शाळा भरणे, हे चांगले आहे.

२. एका शिफ्टमध्ये शाळा भरल्यामुळे अनेक प्रभावशाली व चांगल्या गोष्टी संपादन करता येतात.

३. दुबार पद्धतीपेक्षा एका शिफ्टमधील संवाद हा जास्त प्रभावशाली होता की, ज्यामुळे त्यांच्यामध्ये चांगल्याप्रकारे संबंध प्रस्थापित करता येत होता.

४. एखादा निर्णय हा वैयक्तिक किंवा सांघिक पातळीवर लवकर घेण्याची प्रक्रिया एक वेळा भरणाऱ्या शाळेत अतिशय सुलभ होत होती.

५. एक वेळ भरणाऱ्या शाळेत देखरेख करणेसुद्धा अतिशय व्यवस्थित होत होते.

**Panda S. N.**

Administratve Behaviour of Headmasters some correlates and Background factors-

(Ph.D. Edu. Raj Uni. 1975)

**उद्दिष्टे**

१. मुख्याध्यापाच्या वास्तव आदर्श प्रशासन वर्तनाच्या प्रवाहाचा अभ्यास करणे.

२. वास्तव व आदर्श प्रशासनिक वर्तनातील सहसंबंध शोधणे तसेच आदर्श व वास्तविक

प्रशासनिक वर्तन व संस्थेची प्रतिष्ठा व शाळेची परिणामकारकता यातील संबंधाचा शोध घेणे.

३. प्रशासनिक वर्तनामागील घटकांची ओळख करून घेणे.

हे संशोधन राजस्थानमधील १६८ शाळांतील २००० शिक्षकांची स्तरीय पद्धतीने निवड करून त्यावर केले गेले. संशोधनासाठी Headmasters Behaviour Description Questionnaire (HBDZ) याद्वारे मुख्याध्यापकांच्या वर्तनाची माहिती घेण्यात आली.

**प्रमुख निष्कर्ष**

१. मुख्याध्यापकांच्या प्रशासनिक वर्तनामध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिकता, शैक्षणिक उदासीनता आणि कमी प्रभावी संवाद सहकार्यात कमतरता आणि इतरांच्या तुलनेत कमी प्रमाणातील फलनिष्पत्ती दिसून आली.

२. आदर्श प्रशासनिक वर्तन हे इतराचा विचार करणारे फलनिष्पत्तीकडे लक्ष देणारे, सहिष्णू, सहकारिता, रचनात्मकता व समायोजकता मुक्त असते, तर अवांछनीय वर्तन हे अधिकारिता शैक्षणिक उदासीनता व पारंपरिकता मुक्त असते.

३. प्रभावी शाळांचे मुख्याध्यापक हे कमी अधिकारशाहीवादी असलेले दिसून आले.

४. शहरी शाळांतील मुख्याध्यापक हे जास्त समायोजनक्षम, परिणामकारक व सुसंवादी असल्याचे आढळून आले.

५. मुलींच्या शाळांच्या तुलनेने मुलांच्या शाळांचे मुख्याध्यापक हे कमी अधिकारवादीचे, सुसंवादी व दुसऱ्याचे ऐकून न घेणारे असे आढळून आले.

## Singh H. M.

A study of Leadership Behaviour of Heads of secondary schools in Haryana and its sorrelates.

(Ph.D. Education kur. Uni. 1978)

**उद्दिष्टे**

१. हरियाणामधील माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकाच्या नेतृत्व वर्तनाचा अभ्यास करणे आणि त्यांच्या नेतृत्व वर्तनाच्या इतर व्यावसायिक नेतृत्वाशी तुलना करणे.

२. व्यक्तिमत्त्व घटक, वय, लिंग, अध्यापन व प्रशासन अनुभव यांच्यामधील संबंधन प्रस्थापित करणे.

**नमुना निवड**

हरियाणाच्या प्रत्येक जिल्ह्यातून एक याप्रमाणे १० शाळा निवडल्या. १०० शाळांमधून प्रत्येकी ५ शिक्षक याप्रमाणे १०० मुख्याध्यापक व ५०० शिक्षक होते. व्यावसायिक नेतृत्वाचा नमुना म्हणून ७ कारखानदार व्यवस्थापक, २८ कारखाना निरीक्षक, ७ सैनिक अधिकारी, ७ महा. प्राचार्य, २८ व्याख्याने यांची नमुना निवड केली.

नेतृत्वाचा अभ्यास करण्यासाठी catvel ची १६ P.F. शोधिका वापरण्यात आली होती.

**निष्कर्ष**

१. पाच व्यावसायिक नेत्यांमध्ये मुख्याध्यापकांना तिसरा क्रमांक मिळाला.

२. नेतृत्वगुण हा व्यक्तिमत्त्व घटकाशी संबंधित आहे.

३. नेतृत्वगुण हा लिंगाशी (स्त्री/पुरुष) संबंधित नाही.

४. मुख्याध्यापकाचे नेतृत्व वर्तन हे वयाशी संबंधित नाही. म्हणजेच ते २५ ते ६२ यांमध्ये वय असले पाहिजे, असे नाही.

५. शैक्षणिक पात्रतेशी म्हणजे पदवी किंवा पदव्युत्तर यांच्याशी नेतृत्ववर्तनाचा काहीही संबंध नाही; परंतु पदव्युत्तर मुख्याध्यापक हे केवळ पदवी असलेल्या मुख्याध्यापकापेक्षा समेट घडवून आणण्यास यशस्वी ठरतात.

६. मुख्याध्यापकांचे नेतृत्व वर्तन हे त्याच्या अध्यापनाच्या अनुभवाशी संबंधित नसते.

## Gupta G. P.

Leadership behaviour of secondary school Headmasters in relation to their personality and the climat of their school.

(Ph.D. Edu. SGU. 1978)

**उद्दिष्टे**

१. राजस्थानमधील माध्य. शाळांच्या वातावरणाचा अभ्यास करणे व त्यांचे वर्गीकरण करणे.

२. राजस्थानमधील विविध शाळांच्या वातावरणामध्ये मुख्याध्यापकांच्या नेतृत्व वर्तनाचा अभ्यास करणे.

३. शाळांच्या वेगवेगळ्या वातावरणात मुख्याध्यापकाच्या व्यक्तिमत्त्व विकास घटकांचा अभ्यास करणे.

४. माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या नेतृत्वाचा आणि व्यक्तिमत्त्व विकास घटकांचा

अभ्यास करणे की, ज्यामुळे शालेय वातावरण योग्य ठेवण्यास मदत होईल.

**नमुना निवड**

राजस्थानमधील १०० शाळांच्या गटात निवड केली. शर्मा यांची School Organizational Climate Description.

Questionnaire, the stogdil's Leadership Behaviour Descrptions Questionnaire (LBDQ) and 16 PF Test form A of Catteli and Eber, ची माहिती गोळा करण्यासाठी वापर करण्यात आला.

माहिती संकलन करण्यासाठी Correlation, Chi-square चा वापर करण्यात आला.

**प्रमुख निष्कर्ष-**

१. १०० शाळांपैकी १५, १५, १४, २०, २६ आणि १० शाळांमधून असे दिसून आले की, शाळेतील कर्मचारीवर्ग हा मनमोकळा परिचित, नियंत्रित आणि आदरपूर्वक होता.

२. वेगवेगळ्या शाळांच्या मुख्याध्यापकांमध्ये LBDQ च्या आठ मोजमापामध्ये फरक दिसून आला.

३. मुक्त वातावरणातील शाळा या बंदिस्त वातावरणातील शाळांपेक्षा एकात्मता साधण्यासाठी चांगल्या होत्या.

४. शालेय वातावरण आणि LBDQ ची वेगवेगळी मोजमापे यांच्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे सकारात्मक संबंध होते.

**Mahant G. V.**

"Study of Administrative behaviour of Highschool Principal of central Gujarat."

( Ph.D. Edu. MSU. 1979)

**उद्दिष्टे**

१. माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन विकसित करण्यासाठी त्यांच्या प्रशासनीय वर्तनाचे मूल्यमापन करणे.

२. माध्य. शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासनीय वर्तन विकसित करण्याच्या प्रक्रियेचे मूल्यमापन अधिक परिणामकारक करणे.

३. मुख्याध्यापकांचे प्रशासनीय वर्तन आणि विद्यार्थी यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास करणे.

४. मुख्याध्यापकांच्या प्रशासनीय वर्तनाबद्दल स्वतःच्या कल्पना आणि शिक्षकांच्या शाळेविषयी असलेल्या कल्पना यांचा अभ्यास करणे.

५. मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक गोष्टींचा शाळेवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे. उदा. वय, पात्रता, चारित्र्य आदी.

उदा. गुजरातमधील प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन जिल्ह्यांतून २७७ माध्यमिक शाळांची निवड केली की, ज्यामधून १०८४ शिक्षक काम करतात. संशोधकांनी शोधन काढलेल्या

Administrative Behaviour Description Questionaire, Halpin यांच्या OCDQ, Willouer यांच्या Pupli's Control Ideology Measurement Tool, 16 PF Questionnaire of cattel यांचा उपयोग केला गेला. तसेच मिळालेल्या माहितीचे पृथःकरण करण्यासाठी

Chi-Square test, t-test, f-test इ. वापर केला गेला.

**प्रमुख निष्कर्ष**

१. निवडलेल्या शाळांपैकी जवळ-जवळ ३५ टक्के शाळांचे प्रशासनीय वर्तन हे फारच प्रभावशाली होते, तर ३७ टक्के शाळांचे प्रशासकीय वर्तन हे कमी प्रभावशाली होते.

२. लिंग, वय आणि अनुभव यांचा प्रशासनीय वर्तनात फारसा प्रभाव दिसला नाही.

३. मुख्याध्यापकांच्या कल्पना आणि शिक्षकांच्या कल्पना यांमध्ये काहीही संबंध दिसून आला नाही.

४. शाळेच्या बंदिस्त वातावरणापेक्षा मुक्त वातावरणातच जास्त परिणाम होतो, हे दिसून आले.

५. जे मुख्याध्यापक आपले प्रशासनीय वर्तन चांगले आहे असे सांगतात, त्यांचे प्रशासनीय वर्तन हे कमी प्रभावशाली असलेल्या प्रशासनीय वर्तनापेक्षा खालचे दिसून आले.

**Rajeer Lochana, A. A.**

'A study of Administration Behaviour in Secondary school of Tamilnadu'.

(Ph.D. Edu. MSU. 1981)

**उद्दिष्टे**

१. तामिळनाडूमधील प्राचार्य, माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या प्रशासनीय वर्तनाचा अभ्यास करणे.

२. प्रशासनीय वर्तन आणि पारंपरिक किंवा शाळेची प्रगती यांचे मोजमाप करणे आणि



15151

त्यांच्यामध्ये परस्परसंबंध प्रस्थापित करणे.

३. शिक्षकांच्या नीतिमूल्यांचे मोजमाप करून शालेय प्रगतीशी त्याचा काय संबंध आहे, तो शोधून काढणे.

४. ABDS च्या बाबतीत शिक्षकांचे त्यांच्या प्राचार्यांविषयी काय मत आहे, याचे मोजमाप करणे, आणि ABDS प्रमाणे प्राचार्यांचे त्यांच्याविषयी काय मत आहे, हे जाणून घेणे.

तामिळनाडूमधील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतून १८० शाळा निवडल्या Administrater Behaviour Description Scale (ABDS) तसेच Organisation Climate Description Questionnaire (OCDQ), Teacher Moral Inventury Dogmatism Scale (TPSS) Traditional Progressive School Scale (TPSS) इ. सहाय्याने योग्य ती माहिती गोळा केली. वरील सर्व पद्धतीने निवडलेल्या शाळांमधील मुख्याध्यापक आणि शिक्षक यांची माहिती घेतली. मिळालेल्या माहितीचे T-test, Chi-Square test इ. पद्धतीने पृथ्थकरण करण्यात आले.

**निष्कर्ष**

१. मुख्याध्यापकांचे प्रशासनीय वर्तन आणि शालेय सांघिक वातावरण यामध्ये महत्त्वाचा संबंध दिसला नव्हता.

२. सांघिक वातावरणाचा काळ हा मुक्त वातावरणापेक्षा बंदिस्त वातावरणाकडे जास्त होता.

३. शालेय वातावरण आण शिक्षकाची नीतिमूल्ये यामध्ये महत्त्वाचा संबंध दिसून आला.

४. मुख्याध्यापकांच्या प्रशासनीय वर्तनाचा पारंपरिक आणि विकसित अशा प्रकारच्या शाळेवर प्रभाव पडला.

५. मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्यामध्ये नकारात्मक संबंध दिसून आले.

६. मुख्याध्यापकाविषयी शिक्षकांचे व स्वतःच्या प्रशासनाविषयी मुख्याध्यापकामध्ये महत्त्वाचा असा फरक जाणवला नव्हता.

**Sharma Sudha**

"A study of the Leadership Behaviour of Headmasters. Vis-a-vis. the school climate.

( Ph.D. Edu. Agra University- 1982)

**उद्दिष्टे**

१. आग्रा शहरातील कनिष्ठ माध्यमिक शाळेतील सांघिक वातावरणाचे वर्गीकरण करणे.

२. कनिष्ठ माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या नेतृत्ववर्तनाच्या मोजमापाचा अभ्यास करणे.

३. नेतृत्व गुण, शालेय वातावरण आणि विद्यार्थी प्राप्तीमधील संबंधाचा अभ्यास करणे.

**पद्धत-**

आग्रा जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागात वसलेल्या अशा दोन्ही विभागांतून ६० कनिष्ठ माध्यमिक शाळांचा अभ्यास केला. त्यासाठी ५४८ शिक्षक घेतले आणि उदाहरण म्हणून इयत्ता आठवीत शिकत असलेले १३४६ विद्यार्थी घेतले. त्यासाठी एम. एल. शर्मा यांनी लिहिलेल्या 'The Leadership Behaviour Descritpive Questionnaire (LBDQ) school organisational Climates' आणि Description Qeustionnaire आणि सुधा राणी यांच्या 'The Achievement Record Form' यांचा उपयोग केला. गोळा केलेली माहिती T-test, Chi-square आणि विविध गोष्टींचे पृथ्थकरण करून केले गेले.

**प्रमुख निष्कर्ष-**

१. विविध प्रकारच्या शाळांमध्ये शालेय वातावरण आणि नेतृत्वगुण हा महत्त्वाचा फरक दिसून आला.

२. आग्रा शहरातील अनेक प्रकारच्या वातावरणात कसलाही फरक दिसून आला नाही.

३. लिंग (मुले व मुली), स्थान (शहरी / ग्रामीण) आणि व्यवस्थापन यामध्ये कोणताही महत्त्वाचा घटक दिसून आला नव्हता.

४. यामध्ये महत्त्वाचा फरक असा की मोकळे, नियंत्रित, परिचित आणि पालकांना आवडेल अशाप्रकारची वातावरण निर्मिती त्यांच्या नेतृत्वात दिसून आली.

५. LBDQ च्या विविध मोजमापामध्ये कोणताही महत्त्वाचा (बदल) फरक दिसून आला नव्हता.

६. जरी नेतृत्व वर्तनात सकारात्मक संबंध दिसून आले नसले तरी परिचित वातावरणात त्यांचा चांगला उपयोग झाला.

**बाजपाई एम.**

स्वातंत्र्यानंतरचा उत्तर प्रदेश राज्यातील माध्यमिक प्रशासनाचा अभ्यास.

(पीएच.डी. कानपूर विद्यापीठ, १९८४)

**उद्दिष्टे**

१. उत्तर प्रदेशातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाची माहिती मिळविणे.

२. प्रशासनामध्ये सुधारणा करण्यासाठी उपाय सुचविणे.

**संशोधनासाठी वापरलेली साधने**

शासनाकडील विविध कागदपत्रे व रिपोर्टचा अभ्यास करून माहिती मिळविणे.

**कार्यपद्धती**

संशोधकाने विविध कागदपत्रे व शासनाकडील रिपोर्टवरून माहिती मिळविली.

**निष्कर्ष**

१. माध्यमिक शिक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्था व काही संस्थांद्वारा दिले जाते.

२. स्थानिक संस्थांद्वारा चालविल्या जाणाऱ्या संस्थांमध्ये प्रशासन गतिशील आहे व त्यावर शासनाची कडक नजर आहे. येथील कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात.

**रायरीकर ए. डी.**

'मावळ तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शैक्षणिक प्रशासन आणि त्याचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीशी संबंध'

(एम.फिल्. पदवी प्रबंध पुणे विद्यापीठ- १९९०)

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. मावळ तालुक्यातील माध्यमिक शाळांमधील शैक्षणिक प्रशासनाचे सर्वेक्षण करणे.

२. मावळ तालुक्यातील माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संपादणुकीची पाहणी करणे.

३. मावळ तालुक्यातील माध्यमिक शाळांमधील शैक्षणिक प्रशासन आणि शैक्षणिक उपक्रम यांचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीशी संबंध अभ्यासणे.

**कार्यपद्धती-**

संशोधिकेने माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला. काही शाळांना संशोधिकेने प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावल्या गोळा केल्या. काही प्रश्नावल्या पोस्टाद्वारे पाठवून माहिती गोळा केली. मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या मुलाखती घेतल्या. मुख्याध्यापक व शिक्षक-विद्यार्थी यांच्याकडून प्रश्नावली व माहिती मिळविली.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने मावळ तालुक्यातील २३ मुख्याध्यापक, ११४ शिक्षक व इयत्ता ८ वीमधील ८०८ विद्यार्थी संशोधनासाठी निवडून त्यांच्याकडून माहिती मिळविली.

**निष्कर्ष-**

१. मुख्याध्यापकांना शैक्षणिक प्रशासनासाठी वेळ अपुरा मिळतो.

२. शिक्षकाकडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविल्या जातात.

३. विद्यार्थ्यांची संपादणूक वाढविण्यासाठी माध्यमिक शाळेत उपक्रम राबविले जातात.

४. शैक्षणिक प्रशासन जेवढे प्रभावी असते, तेवढ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची संपादणूक सुधारण्यास मदत होते.

**Jumnal Basappa M.**

Adjustment Problems of students of Navodaya Vidyalayas in Karnataka in relation to the organizational climate of the school- A study.

(M.Phil. Shivaji Uni. 1991)

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. जवाहर नवोदय विद्यालयातील संघटनात्मक वातावरण ओळखणे व त्यांचे वर्गीकरण करणे.

२. प्रत्येक जवाहर नवोदय विद्यालयाचा संघटनात्मक वातावरणाचा मूळ तक्ता बनविणे.

३. जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक, शैक्षणिक समायोजनाचा वेगवेगळ्या संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास करून त्यांची तुलना करणे.

**कार्यपद्धती**

संशोधकाने माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला. संशोधकाने विद्यार्थी, शिक्षकांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली भरून घेतली, संशोधकाने ७४८ विद्यार्थी व ३१ शिक्षकांची संशोधनासाठी निवड केली.

**निष्कर्ष**

१. जवाहर नवोदय विद्यालयातील संघटनात्मक वातावरण वेगवेगळ्या प्रकारात आढळून येते.

२. शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक समायोजनाच्या बाबतीत फरक आढळून येत नाही.

३. मुले व मुलींच्यात भावनिक समायोजनात फरक आढळून येतो.

४. मुले व मुलींच्यात शैक्षणिक समायोजनाच्या बाबतीत फरक आढळून येत नाही.

**Pati. S.**

A study of the administrative and supervisory prolems of secondary school headmasters of cuttack I circle cuttack.

(M.Phil. Edu. Otkal Uni. 1992 )

'कटक येथील माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांना येणाऱ्या प्रशासकीय आणि पर्यवेक्षीय समस्यांचा एक अभ्यास उद्दिष्टे-

१. माध्यमिक शिक्षण संस्थांच्या शैक्षणिक वातावरणाचा अभ्यास.

२. माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय आणि पर्यवेक्षीन अडचणींचा शोध घेणे.

३. या विविध समस्यांचा शोध घेणे.

४. या समस्यांवरील मुख्याध्यापकांच्या दृष्टिकोनाचे मूल्यामापन करणे.

५. या समस्यांवरती उपाययोजना सुचविणे.

**कार्यपद्धती**

नमुना निवडीमध्ये ४० माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांचा समावेश होता. प्रश्नावली व मुलाखतीद्वारे संबंधित माहिती संकलित केली. संकलित माहितीवर गुणात्मक तंत्रे वापरून प्रक्रिया करण्यात आली.

**निष्कर्ष**

१. अभ्यासक्रमाच्या समस्येमध्ये आवश्यकतेपेक्षा कमी शिक्षकांची भरती आणि शिक्षकांच्या व्यावसायिक पात्रतेचा अभाव होता.

२. ७५ टक्के मुख्याध्यापकाच्या मते पालक आपल्या पाल्याच्या प्रगतीविषयी विचारपूस करत होते.

३. सर्व सहकारी शिक्षक कार्यालयीन कामकाजात मदत करत असल्याचे सर्वच मुख्याध्यापकांनी सांगितले.

४. शाळा व समाजातील संबंध फायदेशीर असल्याचे बहुतांश मुख्याध्यापकांचे मत आहे.

५. स्थानिक लोक शालेय कामकाजात सहकार्य करीत असल्याचे साधारणतः ९० टक्के मुख्याध्यापकांनी सांगितले.

६. शिक्षक पालक संघ ९ शाळांमध्ये तर समाजसेवा उपक्रम ७ शाळांमध्ये राबविला जात होता.

**मुळे नारायण भीमराव**

सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास

(पीएच.डी. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. डिसें. २००१)

**उद्दिष्टे**

१. सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शैक्षणिक नियोजनाचे सर्वेक्षण करणे.

२. सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यातील शैक्षणिक प्रशासनाचे सर्वेक्षण करणे.

३. कनिष्ठ महाविद्यालयांच्या नियोजन आणि प्रशासनाच्या संदर्भात शिफारशी करणे.

**कार्यपद्धती**

संशोधकाने माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला. प्राचार्यांकडून आलेल्या प्रश्नावल्या, उपप्राचार्य पर्यवेक्षक, शिक्षक, शासकीय अधिकारी यांच्या मुलाखती, कनिष्ठ महाविद्यालय भेटी, निरीक्षणे यांद्वारे माहिती मिळविली.

**निष्कर्ष**

१. सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रतिसादक प्राचार्यांत कला शाखेचे पदवीधर प्रशिक्षित प्राचार्यांचे प्रमाण ४३.७५ टक्के, तर विज्ञान शाखेचे पदवीधर प्रशिक्षित प्राचार्यांचे प्रमाण १७.८५ टक्के आढळून आले.

२. एकही प्राचार्य कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गांना अध्यापन करीत नसल्याचे दिसून आले.

३. माध्यमिक शाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य माध्यमिक शाळांप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन व प्रशासन पाहत असल्याचे आढळून आले.

४. वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य वरिष्ठ महाविद्यालयांप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे नियोजन व प्रशासन पाहात असल्याचे दिसून आले.

**डॉ. आशालता जगताप**

सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापकांना येणाऱ्या अडचणी एक चिकित्सक अभ्यास.

(पीएच.डी. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.२००५)

**उद्दिष्टे**

१. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना शासन व शिक्षण खाते याबाबत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

२. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना 'मुख्याध्यापक' पदाबाबत येणाऱ्या अडचणींचा

अभ्यास करणे.

३. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना शिक्षक, विद्यार्थी, समाजाच्या बाबतीत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

४. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना भौतिक सुविधांबाबत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

**पद्धती**

संशोधिकेने प्रस्तुत संशोधन वर्तमानकाळातील असल्याने वर्णनात्मक संशोधक पद्धतीतील शालेय सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे.

प्रश्नावली, मुलाखत, पडताळासूची या साधनांचा वापर केला गेला. सोलापूर जिल्ह्यातील ४४३ मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक शाळा संशोधनासाठी निवडल्या.

**निष्कर्ष**

१. शैक्षणिक धोरणात बदल करावा असे ७५ टक्के प्रतिसादकांनी म्हटले आहे. याचाच अर्थ असा की, शासनाने आवश्यकतेनुसार शैक्षणिक धोरणात बदल करण्याबाबत मुख्याध्यापकांचा सकारात्मक दृष्टिकोन आहे.

२. शाळांचा वार्षिक तपासणी होत नसल्याने शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावतो, असे प्रश्नावलीतील प्रतिसादावरून दिसून आहे.

३. शिक्षक गावातील असल्यास गावातील राजकारणाचा शालेय कामकाजावार परिणाम होतो, असे प्रतिसादकांनी प्राधान्यक्रमाने सांगितले आहे.

४. शाळेत खोडकर विद्यार्थ्यांची संख्या १० टक्के आहे.

५. ग्रामीण भागातील पालकांनी शाळेनेच पाल्याच्या अभ्यासाकडे पूर्ण लक्षद्यावे, असे प्राधान्याने म्हटले आहे.

## २.२ संशोधनाशी संबंधित साहित्याचा आढावा

**डॉ. चं. द. इंदापूरकर (सप्टेंबर १९९३) माध्यमिक शाळांतील गर्दी :**

या लेखात मुख्याध्यापकांना भेडसावणारी समस्या म्हणजे वाढती विद्यार्थीसंख्या. त्यामुळे वर्गात बेशिस्त होते, परिणामकारक अध्यापन होत नाही. त्यामुळे मुख्याध्यापकांनी इतर सहकारी, शिक्षणाधिकारी, पालक, चालक आदी मदत घेऊन ती समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. यासाठी आवश्यक ते संशोधन प्रकल्प व कृती योजना राबवाव्यात.

**प्र. रा. बोधनकर (जानेवारी १९९४) शालेय वातावरण आणि मुलांवरील ताण :**

या लेखात आजच्या विद्यार्थ्याला जास्त विषय, गृहपाठ, कार्यपुस्तिका, वह्या यांचे प्रमाण जास्त आहे. या ओझ्याखाली पाठीचा कणा वाकलेला विद्यार्थी, शालेय वातावरणासंबंधी आपली भूमिका स्पष्ट करतो. या लेखात शिक्षकाकडून अपेक्षा व शाळेकडून अपेक्षा यांची माहिती आहे. अध्यापन कार्य भौतिक सुविधांबाबत माहिती मिळते. चांगले शालेय वातावरणासाठी चांगल्या सोयीसुविधा हव्यात.

**बी. एन. कांबळे (फेब्रुवारी १९९५) परीक्षेतील पर्यवेक्षण :**

या लेखात परीक्षेच्या कालावधीत येणाऱ्या समस्या पर्यवेक्षकांना होणारा त्रास, शिक्षणक्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्राला लागलेला कलंक आदी गोष्टींचा उल्लेख आहे. त्यात सर्व शिक्षकांनी सामूहिक प्रयत्न करून मुख्याध्यापकांना शालेय परीक्षेचे वातावरण चांगले राखण्यास मदत करायला हवे.

**एस. पी. शेडमाके (ऑक्टोबर २००१) विद्यार्थ्यांचे गैरवर्तन - वर्ग व्यवस्थापनेतील समस्या :**

त्याच्या या लेखामध्ये विद्यार्थ्यांना पूर्वी 'छडी लागे छम छम' याप्रमाणे शिस्त लावली जात होती, पण सध्या स्वयंशिस्त लावण्यावर भर आहे. विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीला वेळीच लगाम घालावा, वर्गात वाढती संख्या हे एक कारण असले तरी गैरवर्तणुकीची कारणे शोधून त्यावरती उपाय करावा. विद्यार्थ्यांना वादविवाद स्पर्धा, परिसंवाद, हस्तलिखिते यांचे लेखन आदी उपक्रमांतून लेखन, भाषण, वाचन या क्षमता विकसित कराव्यात. श्रमदान, खेळाचे शिबिर आयोजित करावेत. त्यांच्या नेतृत्वाचा विकास, नम्रता, साहस, संयम, आत्मविश्वास आदी गुणांची जोपासना करावी. यामुळे वर्गव्यवस्थापन सुलभ जाईल व शालेय वातावरण निकोप राहील.

**प्रा. डी. आर. कुलकर्णी (जानेवारी २००१) शैक्षणिक संशोधनाची गरज व महत्त्व :**

या लेखात संशोधन शब्दाची उत्पत्ती कशी झाले ती सांगितले आहे. संशोधन या मराठी शब्दाला

इंग्रजी 'रिसर्च' हा शब्द आहे. तो 'फ्रेंच' 'सर्चिर' या शब्दापासून आला आहे. त्याचा अर्थ शोध घेणे, हा असून, रिसर्च म्हणजे पुन्हा पुन्हा तपासून पाहणे होय. शिक्षण क्षेत्रात त्याची गरज आहे तसेच प्रत्येक व्यक्तीने संशोधनवृत्ती अंगी बाणावी, असे त्यांचे मत आहे. दैनंदिन व्यवहारात उपयोग होईल. सामाजिक, धार्मिक, राजनीतिक व राष्ट्रीय समस्यांचे निराकरण होण्यास मदत होईल.

**सौ. मुळावकर कल्पना संतोष (जानेवारी २००१) छद्म संशोधन :**

या लेखात संशोधकाने चुकीच्या दिशेने वा पद्धतीने व दिशाभूल करणारे संशोधन करायला नको. या गोष्टी शिक्षण क्षेत्राच्या प्रगतीला मारक ठरतात. संशोधन ही शैक्षणिक कष्टाची व प्रामाणिकपणाची बाब आहे. प्रामाणिकपणे, तळमळीने खरे संशोधन सातत्याने होत राहणे, हा या समस्येवरचा उपाय आहे, असे त्यांचे मत आहे.

**ल. ग. घटे (जुलै २००२) मुख्याध्यापकांची चिंतनिका :**

या लेखात त्यांना मुख्याध्यापकांना वर्गखोल्या, व्हरांडे, भिंती, कवायतीचे मैदान, बाग, पाणी पिण्याची सोय आदी बाबतींत वा भौतिक सोयी नसतील तर समाजातील विविध दानशूर घटकांकडून कसा पूर्ण करून घ्यावा, याची चर्चा आहे.

**ल. ग. घटे (मार्च २००३) मुख्याध्यापक व त्यांचे पुढील काही जटील प्रश्न :**

प्रस्तुत लेखात शिक्षक दुसऱ्या तासानंतर वेळेवर वर्गावरीत जात नाहीत. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या रजेबाबतीत काही अडचणी येतात. जास्त शिक्षक रजेवरती गेल्यास समस्या निर्माण होते. वर्ग शिक्षकांची समस्या असते. परीक्षांची समस्या असो, सहलीबाबत आदी प्रश्न असतात. परंतु शाळा ही निर्जीव यंत्राशी किंवा कागदाशी काम करीत नाही, ती जिवंत व्यक्तीशी काम करते. त्यामुळे मुख्याध्यापकाचे काम गुंतागुंतीचे होते. अशावेळी त्यांना स्वतःचे मत व अधिकार वापरणे हिताचे असते.

**प्रा. विजयकुमार पाईकराव (डिसेंबर २००३) प्रभावशाली मुख्याध्यापक बनण्यासाठी शालेय व्यवस्थापक शिक्षणक्रम :**

प्रस्तुत लेखात मुख्याध्यापकांच्या नावे शाळा ओळखावयाची असेल तर आर्थिक व प्रशासकीय व्यवस्थापनात सुसूत्रता हवी. अनुभवापेक्षा मानवी व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन, विद्यार्थी कल्याण आणि विद्यार्थी गुणवत्ता यांचे ज्ञान हवे. शिक्षकाबरोबर कर्मचारीवर्गाला मार्गदर्शन करावे. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांना आधुनिक व्यवस्थापनाची कौशल्ये आणि आवश्यक ज्ञान. अभिवृत्तीची ओळख करून दिली जाते. शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक नवोपक्रम आणि प्रयोगशील दृष्टी निर्माण करणे, व्यवस्थापनात नवीन कौशल्ये वापरण्यास प्रवृत्त करणे, त्यात सुसूत्रता आणि सातत्य

निर्माण करण्यासाठी अभिवृत्ती व प्रेरणा निर्माण केली जाते.

**प्रा. अजयकुमार भीमराव पाटील (जून २००४) शालेय शिस्त :**

प्रस्तुत लेखात शिस्तीचे महत्त्व सांगितले आहे. संस्कारक्षम वय असल्यामुळे या वयातील संस्कार कायम टिकतात. आपल्या कुटुंबात व शाळेतील वातावरण लोकशाही प्रधान हवे. विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता केली पाहिजे, त्याच्या शिक्षणाबद्दल जागरुकता दाखविली पाहिजे. शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन केंद्रे स्थापन करावीत.

**श्री. अशोक सुरडकर (डिसेंबर २००५) मुलांच्या शैक्षणिक विकासात पालकांचा सहभाग :**

या लेखात मूल लहानापासून कुटुंबात वावरते. त्यांना चांगल्या सवयी लावाव्यात. घरात शैक्षणिक वातावरणाची निर्मिती करावी, शैक्षणिक साहित्य पुरवावे. पालकांनी स्वतः आदर्श घालून द्यावेत, मुलांना आरोग्यदायक सवयी लावाव्यात, अशा वेळी तो विद्यार्थी शालेत गेल्यानंतर चांगल्या पद्धतीने वागेल, त्यामुळे आपले, आपल्या मुलांचे, समाजाचे व देशाचे भवितव्य उज्ज्वल होईल.

## २.३ प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण

वरील संबंधित साहित्यावरून व संशोधनाच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, बरेचसे संशोधन हे मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तनाच्या बाबतीत आढळून येते, तसेच माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना येणाऱ्या अडचणींबाबत असते. काही संशोधने प्रशासन आणि नियोजनाच्या बाबतीत झालेली आहेत.

मुख्याध्यापकांना प्रवेशाच्या बाबतीत, शिस्तीच्या बाबतीत तसेच काही माध्यमिक शाळेतील शैक्षणिक प्रशासनाशी विद्यार्थ्यांच्या संपादणुकीशी संबंध किंवा मुख्याध्यापकांना प्रशासकीय व पर्यवेक्षीय समस्यांबाबत संशोधन झालेले आहे किंवा शाळेतील संघटनात्मक वातावरण कसे आहे, त्यातील अडचणी, समस्या आदींवरती संशोधन झालेले आहे. परंतु मुख्याध्यापकांचे एकंदरीत प्रशासकीय वर्तन व त्यांच्या शाळेतील संघटनात्मक वातावरणावरती झालेला परिणाम यावरती अजून संशोधन झालेले नाही. त्यावरती संशोधन झाले तर मुख्याध्यापक आदर्श कसा बनेल, नवीन मुख्याध्यापकांना येणाऱ्या अडचणी कमी होतील. प्रशासकीय कामाचा दर्जा सुधारणे, मुख्याध्यापकांना प्रशिक्षणवर्ग आयोजित करावे लागतील या उद्देशाने हे संशोधन नावीन्यपूर्ण आहे व त्याचा फार उपयोग होईल म्हणून या संशोधनाचा विषय निवडलेला आहे.